आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१२ जून २०२४ - बुधवार

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन या महिन्याच्या २४ तारखेपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी, लोकसभेच्या सभापतींची निवड, राष्ट्रपतींचं अभिभाषण आणि त्यावर चर्चा होईल. राज्यसभेचं २६४ वं अधिवेशन २७ जूनपासून सुरू होईल आणि संसदेचं हे अधिवेशन ३ जुलै रोजी संपेल.

<><><><><>

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची अधिसूचना राज्यपाल रमेश बैस यांनी आज जारी केली. त्यानुसार विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचं अधिवेशन येत्या २७ जून रोजी सुरु होणार आहे.

<><><><><>

विधान परिषदेच्या नाशिक शिक्षक मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संदीप गुळवे महाविकास आघाडीचे उमेदवार असतील असं आज जाहीर करण्यात आलं. कोकण पदवीधर मतदारसंघात शिवसेनेचे संजय मोरे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला असून तिथं महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे यांचा निवडून येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

<><><><><>

निर्मला सीतारामन यांनी आज नवी दिल्लीत केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला. भाजपचे ज्येष्ठ नेते नितिन गडकरी यांनी आज रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला. निर्मला सीतारामन आणि नितिन गडकरी यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

<><><><><>

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर येत्या तीन आर्थिक वर्षांमध्ये ६ पूर्णांक ७ दशांश टक्के इतका राहील, असा अंदाज जागतिक बँकेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात वर्तवण्यात आला आहे. स्थानिक पातळीवर चांगली मागणी, गुंतवणुकीत वाढ आणि सेवा क्षेत्रातली वाढती उलाढाल यामुळे या आर्थिक वाढीला चालना मिळण्याचा अंदाज आहे. चालू आर्थिक वर्षात वाढीचा दर ६ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील, असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे.

**<><><><><>**

लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांची नवे लष्करप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते या महिन्याच्या ३० तारखेला पदभार स्वीकारतील. विद्यमान लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत. लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आपल्या दीर्घ कारकीर्दीत वेगवेगळ्या पदांवर काम केलं आहे. त्यांना परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदकानं गौरवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

देशात १ जुलै पासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम लागू केले जाणार आहेत. या कायद्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पत्र सूचना कार्यालय देशभरात अनेक ठिकाणी परिसंवाद आयोजित करणार आहे, असं माहिती सेवा विभागाचे अधिकारी राजेश सिन्हा यांनी सांगितलं. याच निमित्तानं उद्यापासून रांची इथं आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाबाबत ते पत्रकारांशी बोलत होते.

**<><><><><>**

डोंबिवली एमआयडीसीतल्या इंडो अमाईन्स आणि अन्य एका कारखान्याला आज सकाळी १० वाजताच्या सुमाराला आग लागली. घटनास्थळी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर आणि नवी मुंबई इथल्या अग्निशमन यंत्रणेकडून आग विझवण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

<><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या शहादा तालुक्यातल्या घोडलेपाडा इथले रहिवास जवान रमेश वसावे यांच्या पार्थिवावर आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. ते भारतीय सैन्य दलात सीआरपीएफ जवान म्हणून कार्यरत होते. झारखंड मध्ये झालेल्या बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी जात असताना भिलवाडा इथं त्यांचं अपघाती निधन झालं होतं.

<><><><>

आषाढी यात्रेनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या प्रवाशांसाठी एसटीने ५ हजार विशेष बस गाड्या सोडण्याचं नियोजन केलं आहे. त्याशिवाय कोणत्याही गावातून ४० किंवा त्या पेक्षा जास्त प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांच्या गावातून थेट पंढरपूरला जाण्यासाठी एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपुरात चंद्रभागा, भिमा, पांडुरंग -आयटीआय महाविद्यालय आणि विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत.

<><><><>

भाजपाचे ज्येष्ठ नेते मोहन चरण मांझी आज ओदिशाच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्यासोबत कनकवर्धन सिंह देव आणि प्रवती परिदा हे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत.

**<><><><><>**

तेलुगु देसम पार्टीचे अध्यक्ष नारा चंद्राबाबू नायडू यांनी आज आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यपाल एस अब्दुल नझीर यांनी नायडूंसह २४ मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

**<><><><><>**

**कोल्हापूर** जिल्ह्यात गेल्या २ दिवसापासून पाऊस सुरु आहे. जिल्ह्यात गगनबावडा, शाहूवाडी, भुदरगड, शिरोळ  या भागात काल पावसाच्या सरी कोसळल्या.  पावसानं उघडीप दिलेल्या भागात सध्या पेरणीची लगबग सुरु असून भात, सोयाबीन, भुईमूग यांच्या पेरणीला वेग आला आहे.

**हिंगोली** जिल्ह्यात सिरसम, बासंबा, माळहिवरा या भागात काल संध्याकाळी जोरदार पाऊस झाला. कळमनुरी तालुक्यातल्या आखाडा बाळापूर शिवारात वीज पडल्यानं काल एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

**बुलढाणा** जिल्ह्यात काल रात्री वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्यानं अनेक घरांचं नुकसान झालं. झाडाला बांधलेला झोपाळा वाऱ्यामुळे हवेत उंच उडाल्यानं त्यावर बसलेली ६ वर्षांची मुलगी जमिनीवर आपटून तिचा मृत्यू झाला.

**//<><><><><>//**